# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र. १९/का.७,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ३०/१२/२०११.

निवडणूक तात्काळ
फॅक्स/ई-मेल

प्रति,
जिल्हाधिकारी,
ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगांव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर व गडचिरोली

विषय:- जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

महोदय,

सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये २७ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत असलेल्या ३०९ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ मध्ये देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१, कलम १३ अन्वये राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी विभागून ती निवडणुकीसाठी छापून घेणे व ती अधिकाऱ्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. या प्रयोजनासाठी दिनांक ५ जानेवारी, २०१२ ही तारीख अधिसूचित करण्यात आली आहे. या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी संबंधित निवडणूक विभाग/निर्वाचक गणात विभागून निवडणूक विभाग/निर्वाचक गणनिहाय मतदार यादी तयार करावयाची आहे. सदर तारीख अधिसूचित करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने काढलेल्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१८/का-५, दिनांक- ३० डिसेंबर, २०११ ची प्रत सोबत जोडली आहे.

३. सर्वसाधारणपणे निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी नागरिकांकडून त्यांची नावे मतदार यादीमध्ये नसल्याबाबत मोठया प्रमाणावर तक्रारी येतात. राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी तयार करण्याकरिता अधिसूचित केलेल्या तारखेबाबत नागरिकांना वेळीच माहिती मिळाली तर ते मतदार यादीमधील चुका/त्रुटी दूर करुन घेण्यासंदर्भातील (नावे समाविष्ट करणे किंवा वगळणे) कार्यवाही करु शकतील. परिणामी, मतदार यादीबाबत येणाऱ्या तक्रारींमध्ये मोठया प्रमाणामध्ये घट होऊ शकते. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यासाठी प्रसिध्दी पत्रक तयार करुन त्यास पुढे नमूद केल्याप्रमाणे व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी.

१) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचना फलकावर
२) निवडणूक असलेल्या संबंधित प्रभागामध्ये मोक्याच्या ठिकाणी
३) स्थानिक वृत्तपत्रांमध्ये
४) स्थानिक केबल टी.व्ही. वर

४.  मतदार यादी अधिप्रमाणित करण्यापूर्वी त्याचे प्रारुप संबंधित निवडणूक विभागातील/निर्वाचक गणातील मतदारांच्या माहितीसाठी सोमवार दिनांक- ९ जानेवारी, २०१२ रोजी प्रसिध्द करण्यात यावे. विधानसभा मतदार यादीवरुन निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची मतदार यादी तयार करताना काही चुका राहिल्या असतील तर त्यासंदर्भात दिनांक- १३ जानेवारी, २०१२ पर्यंत संबंधितांकडून हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभा मतदार याद्यांवरुन जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांकरिता मतदार याद्या तयार करताना,

१) लेखनामध्ये /छपाईमध्ये काही चुका असल्यास त्या सुधारण्यात याव्यात.

२) दुसऱ्या निवडणूक विभाग/निर्वाचक गणातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नांवे वगळण्यात यावीत व योग्य त्या निवडणूक विभाग/निर्वाचक गणात अंतर्भूत करण्यात यावीत.

३) जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या संबंधित निवडणूक विभाग/निर्वाचक गण क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, निवडणूक विभाग/निर्वाचक गण मतदार यादीमध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अश्या मतदारांची नांवे मतदार यादीत समाविष्ट करण्यात यावीत.

५.  त्यानंतर दिनांक- १७ जानेवारी, २०१२ रोजी मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यात याव्यात व त्याबाबतची सूचना दिनांक- १७ जानेवारी, २०१२ रोजी प्रसिध्द करण्यात यावी. याबाबत राज्य निवडणूक आयुक्तांचे अधिकार प्रदान केल्याबाबतच्या क्रमांक-एसईसी/१०९६/प्र.क्र.०६/९६/पीआर, दिनांक- १९/११/१९९६ रोजीच्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

६.  जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी अधिनियमाच्या कलम १३ नुसार विधानसभा मतदार यादी निवडणूक विभाग/निर्वाचक गणनिहाय विभागण्यात येईल याची काळजी घ्यावी व त्याची छापील प्रत अधिप्रमाणित करण्याचपूर्वी निवडणूक विभाग/निर्वाचक गण मतदार यादी अतिशय काळजीपूर्वक तपासण्यात यावी. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/१०९६/प्र.क्र. २८/९७/पंरा, दिनांक-१६ जानेवारी, १९९७ व क्रमांक- रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दिनांक- ११ ऑक्टोबर, २०१० कृपया पहावे. (प्रत संलग्न)

७.  प्रारुप मतदार यादी आणि अंतिम मतदार यादीसंदर्भात द्यावयाच्या सूचनांचे नमुने सोबत जोडले आहेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

**सहपत्रे : वरीलप्रमाणे**

प्रत:-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. विभागीय आयुक्त (सर्व)
४. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
५. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती (कार्या-७), राज्य निवडणूक आयोग

## परिशिष्ट-२

**(राज्य निवडणूक आयागाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१९/का-७, दिनांक- ३०/१२/२०११ सोबतचे सहपत्र )**

## आगामी जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

| | **निवडणूकीचा टप्पा** | **टप्पा सुरु करण्याची/पूर्ण करण्याची तारीख** |
|---|---|---|
| **१.** | **मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक** | **५ जानेवारी, २०१२ (गुरुवार)** |
| २. | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांकरिता तयार केलेली मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | ९ जानेवारी, २०१२ (सोमवार) |
| ३. | मतदार यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | १३ जानेवारी, २०१२ (शुक्रवार) |
| ४. | निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या छापील मतदार याद्या अधिनियमाच्या कलम १३ खाली अधिप्रमाणित करण्याचा दिनांक | १७ जानेवारी,२०१२ (मंगळवार ) |
| ५. | निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या मतदार याद्या लोकांच्या माहितीसाठी ठेवण्यात आल्या आहेत याबाबतची सूचना प्रसिध्द करण्याची तारीख | १७ जानेवारी,२०१२ (मंगळवार ) |



( ध. मा. कानेड )

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

F:\aab-zpps-voter list programme-२०११-१२.doc

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० डिसेंबर, २०११

# आदेश

क्रमांक - रानिआ / मनपा-२०११ / प्र. क्र. १८ / का.०५- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम ७अ, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ च्या कलम १२, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५) चे कलम १३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन दि. ५ जानेवारी, २०१२ रोजी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या या अधिनियमांतर्गत असलेल्या महानगरपालिका / जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या माहे फेब्रुवारी-मार्च, २०१२ मध्ये होणा-या सार्वत्रिक तसेच पोटनिवडणूकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

## प्रारुप मतदार याद्या तयार असल्याची सूचना

------------------- जिल्हा परिषद / पंचायत समिती क्षेत्रातील सर्व लोकांना या जाहीर प्रसिध्दीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीकरिता राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०१२/प्र.क्र. /का-७, दिनांक- ---------- अन्वये मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. राज्य निवडणूक आयुक्त यांची अधिसूचना क्रमांक- ---------------- दिनांक- ------अन्वये ---------------- जिल्हा परिषद / ------------------- पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता दिनांक- ----------------- अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीमधून प्रारुप मतदार यादी तयार केली असून ती यादी दिनांक- -------- रोजी प्रसिध्द केलेली आहे. या प्रारुप मतदार यादीची प्रत जिल्हाधिकारी/तहसिलदार यांचे कार्यालयामध्ये पाहणीसाठी व निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. या यादीसंदर्भात नागरिकांच्या काही हरकती किंवा सूचना असल्यास त्या दिनांक- ----------------- पर्यंत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी सादर कराव्यात. या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.

स्वाक्षरी
जिल्हाधिकारी/प्राधिकृत अधिकारी

## अंतिम मतदार याद्या तयार असल्याची सूचना

क्रमांक- ---------------------------दिनांक- ---------------- च्या सूचनेद्वारे -----------जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या येत्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रारुप मतदार याद्या हरकती व सूचनांकरिता दिनाक- ----------------- रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. ------------------ जिल्हा परिषद/पंचायत समिती क्षेत्रातील सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १३ च्या उपकलम १ व कलम ५८ च्या उपकलम १ब अन्यये ------------- जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभाग क्रमांक- ------------- ते -------------- व पंचायत समितीच्या क्षेत्रातील निर्वाचक गण क्रमांक -------------- ते --------------- च्या प्रारुप याद्यासंबंधी प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन, अधिप्रमाणित अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यात येत आहेत. त्या पाहणीसाठी व निरीक्षणासाठी खाली नमूद केलेल्या ठिकाणी उपलब्ध राहतील.

जिल्हाधिकारी ------------------- यांचे कार्यालय
जिल्हा परिषद ------------------- यांचे कार्यालय
तहसिलदार ------------------- यांचे कार्यालय
पंचायत समिती ------------------- यांचे कार्यालय

स्वाक्षरी
जिल्हाधिकारी/प्राधिकृत अधिकारी

## परिशिष्ट-१

| राज्य निवडणूक आयागाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१९/का-७, दिनांक- ३०/१२/२०११ सोबतची यादी | | | |
|---|---|---|---|
| **मार्च-२०१२ मध्ये मुदती संपणाऱ्या २७ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत असलेल्या ३०९ पंचायत समित्यांची यादी** | | | |
| **अ.क्र.** | **विभाग** | **जिल्हा** | **तालुक्यांची नांवे** |
| १. | कोकण | ठाणे | अंबरनाथ, कल्याण, मुरबाड, वाडा, भिवंडी, वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, शहापूर, विक्रमगड |
| २. | कोकण | रायगड | अलिबाग, पेण, मुरुड, पनवेल, कर्जत, खालापूर, उरण, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, माणगाव, तळा, सुधागड, रोहा |
| ३. | कोकण | रत्नागिरी | राजापूर, लांजा, रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, गुहागर, दापोली, खेड, मंडणगड |
| ४. | कोकण | सिंधुदुर्ग | सावंतवाडी, वेंगुर्ला, कुडाळ, मालवण, कणकवली, देवगड, वैभववाडी, दोडामार्ग |
| ५. | नाशिक | नाशिक | बागलाण, नाशिक, इगतपुरी, मालेगाव, नांदगाव, येवला, चांदवड, निफाड, सिन्नर, दिंडोरी, पेठ, सुरगणा, कळवण, देवळा, त्र्यंबकेश्वर |
| ६. | नाशिक | जळगांव | चाळीसगाव, भडगाव, पारोळा, अमळनेर, चोपडा, एरंडोल, जळगाव, पाचोरा, जामनेर, भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, बोदवड, धरणगाव |
| ७. | नाशिक | अहमदनगर | कर्जत,जामखेड, श्रीगोंदा, अहमदनगर, पाथर्डी, शेवगाव, नेवासा, श्रीरामपूर, कोपरगाव, राहुरी, पारनेर, संगमनेर, अकोले, राहता |
| ८. | पुणे | पुणे | हवेली, खेड, आंबेगाव, जुन्नर, शिरुर, दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर, वेल्हा, मुळशी, मावळ |
| ९. | पुणे | सातारा | सातारा, कोरेगाव, जावली, वाई, खंडाळा, महाबळेश्वर, फलटण, खटाव, माण, कराड, पाटण |
| १०. | पुणे | सांगली | शिराळा, वाळवा-इस्लामपूर, खानापूर, आटपाडी, मिरज, तासगाव, जत, कवठे महांकाळ, पलूस, कडेगाव |
| ११. | पुणे | सोलापूर | अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मंगळवेढा, मोहोळ, बार्शी, माढा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, करमाळा |
| १२. | पुणे | कोल्हापूर | करवीर, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, गडहिंग्लज, चंदगड, आजरा, भुदरगड, राधानगरी, गगनबावडा, शाहूवाडी |
| १३. | औरंगाबाद | औरंगाबाद | सोयगाव, सिल्लोड, कन्नड, वैजापूर, गंगापूर, औरंगाबाद, पैठण, खुलदाबाद, फुलंब्री |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | औरंगाबाद | जालना | घनसावंगी, अंबड, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, जालना, मंठा, परतूर |
| १५ | औरंगाबाद | परभणी | परभणी, गंगाखेड, पाथरी, सेलू, पालम, पूर्णा, जिंतूर, मानवत, सोनपेठ |
| १६ | औरंगाबाद | हिंगोली | हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा-नागनाथ, सेनगाव |
| १७ | औरंगाबाद | बीड | बीड, गेवराई, माजलगाव, पाटोदा, आष्टी, केज, धारुर, अंबेजोगाई, परळी, वडवणी, शिरुर (कासार) |
| १८ | औरंगाबाद | नांदेड | नांदेड, हदगाव, किनवट, भोकर, देगलूर, बिलोली, कंधार, लोहा, मुखेड,अर्धापूर, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, नायगांव खै., मुदखेड, उमरी |
| १९. | औरंगाबाद | उस्मानाबाद | कळंब, भूम, परांडा, उस्मानाबाद, उमरगा, तुळजापूर, नवीन लोहारा, वाशी |
| २० | औरंगाबाद | लातूर | निलंगा, औसा, लातूर, रेणापूर, अहमदपूर, चाकूर,उदगीर, देवणी, शिरुर अनंतपाळ, जळकोट |
| २१. | अमरावती | अमरावती | दर्यापूर, अंजनगाव, अचलपूर, चांदूर बाजार, मोर्शी, वरुड, भातकुली, अमरावती, नांदगाव खंडेश्वर, चिखलदरा, |
| २२ | अमरावती | बुलढाणा | मलकापूर, नांदूरा, मोताळा, बुलढाणा, चिखली, देऊळगांव राजा, सिंदखेड राजा, लोणार, मेहेकर, खामगाव, शेगाव, जळगाव जामोद, संग्रामपूर |
| २३ | अमरावती | यवतमाळ | यवतमाळ, कळंब, बाभुळगाव, आर्णी, दारव्हा, दिग्रस, नेर, केळापूर, घाटंजी, राळेगाव, वणी, मारेगाव, झरी-जामणी, पुसद, उमरखेड, महागाव |
| २४ | नागपूर | नागपूर | नागपूर (ग्रामीण), कामठी, हिंगणा, काटोल, नरखेड, सावनेर, कळमेश्वर, मौदा, उमरेड, भिवापूर, कुही, पारशिवनी, रामटेक |
| २५ | नागपूर | वर्धा | कारंजा, आष्टी, आर्वी, देवळी, वर्धा, सेलू, हिंगणघाट, समुद्रपूर |
| २६ | नागपूर | चंद्रपूर | राजूरा, कोरपणा, चंद्रपूर, भद्रावती, वरोरा, चिमूर, नागभीड, ब्रम्हपुरी, सिंदेवाही, सावली, मूल, गोंडपिंपरी, बल्लारपूर, पोंभूर्णा, जिवती |
| २७ | नागपूर | गडचिरोली | गडचिरोली, आरमोरी, देसाईगंज (वडसा), चार्मोशी, मुलचेरा, कुरखेडा, कोरची, अहेरी, सिरोंचा, एटापल्ली, भामरागड, धानोरा |

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र